UDDHAREDATMNATMANAM

# Gram Vikas Sanstha

Bamkheda T.T. Tal. Shahada, Dist. Nandurbar-425423

ग्रामविकास संस्था संचलित,कला महाविद्यालय बामखेडे त.त.मुख्य ईमारत,सेमिनार हॉल,ग्राऊंड, इंनडोअर स्टेडियम,जीम,ग्रंथालय,वाचनकक्ष,तसेच आय टी इन्फ्रास्टक्चर, लॅग्वेजन लॅब,कॉम्पुटर,प्रोजेक्टर,इंटरनेट तसेच इतर स्थावर मालमत्ता वापर,दुरूस्ती व देखभाल संबधी अधिसूचना ३२२

खालील सूचनापत्र सर्व ग्रामविकास संस्थेशी निगडित कर्मचारी,पदाधिकारी,संचालक व इतर सर्वासाठी लागु करण्यात येत आहे.

**१.इमारतीचा अधिकार :–** सर्व इमारती यात मुख्य इमारत,सेमिनार हॉल,ग्रंथालय,इनडोअर स्टेडीयम,जिमखाना,लेडीज होस्टेल,जिम यांचेवर ग्रामविकास संस्थेचा अधिकार असून त्यांच्या दुरूस्तीचा खर्च ग्रामविकास संस्था करीत असल्यामूळे त्यांचे अधिकार राखून ठेवण्यात येत आहे.

**२. इमारतींचा वापरः–** प्राचार्य व संबधीत ग्रंथपाल,शारीरिक शिक्षण संचालक,संबधीत विभाग प्रमूख यांनी नक्की करून करावा व त्यांच्या देखभालीची व्यवस्था करण्याचे अधिकार संबंधितांना देण्यात येत आहे.वापर करतांना संबंधित मालमत्तेच्या जपून वापर करावा.वापरासंबधी अहवाल प्राचार्यांमार्फत संस्थेच्या अध्यक्षांकडे लेखी अथवा तोंडी स्वरूपात देण्यात यावा.

**३. क्रिंडागण :–** ग्रांऊडच्या वापर करण्याचे सर्वअधिकार शारीरिक शिक्षण संचालक,कला महाविद्यालय बामखेडे यांना देण्यात आले असल्याने सर्वांनी त्यांच्या परवानगीशिवाय तेथे कुठलेही कार्यक्रम आयोजित करू नये.शारीरिक शिक्षण संचालक,यांनी Sports Committee ला वेळोवेळी त्यासंदर्भातील अहवाल सादर करावा.

COORDINATOR IQAC
Gram Vikas Sanstha's
Arts College Bamkheda T.T.
Tal.Shahada,Dist.Nandurbar

Gram Vikas Sanstha's Art's College Bamkheda T.T. Tal.Shahada College EST July 1995



PRINCIPAL
Gram Vikas Sanstha's
Art's College Bamkheda T.T.
Tal.Shahada,Dist.Nandurbar

Scanned by CamScanner

**४.वृक्षारोपन व संवर्धन** :—ग्राऊडच्या संरक्षण भितींना लागून असलेल्या झांडाचे संरक्षण व सवंर्धन करण्याचे कामकाज शारीरिक शिक्षण संचालक, व एन.एस.एस.विभागाने करावे.संपूर्ण परिसरात वृक्षारोपन व वृक्षसंवर्धन या संदर्भात एन.एस.एस विभागाने विद्यार्थ्यांना लावून विशेष कामगिरी करावी.या संदर्भात एन.एस.एस चे विद्यार्थी व कमवा शिका योजनेत सहभागी विद्यार्थ्यांची मदत घेण्यात यावी.

**५.इन्डोअर स्टेडीयम व जिमखाना** :— इमारत तसेच त्यातील जिम व खेळाचे साहित्य वापरणे, सांभाळणे,नविन साहित्य घेणे,दुरूस्ती करण्याचे अधिकार खेळ समिती व शारीरिक शिक्षण संचालकांना देण्यात येत आहे.त्या संबधी वेळोवेळी त्यांनी मा.प्राचार्यामार्फत संस्थेला College Development Committee; Local Management Committee ला सादर करावा.

**६.जिम** :—जिमचा वापर करण्याचे सर्व अधिकार शारीरिक शिक्षण संचालकांना,कला महाविद्यालय बामखेडे त.त.यांना देण्यात आले असल्याने शा.शि.संचालक व मा.प्राचार्य यांच्या परवानगी शिवाय अन्य विद्यार्थ्यांनी जिममध्ये प्रवेश करू नये. शा.शिक्षक संचालक यांनी Sports Committee च्या सभेत वेळोवेळी जिमच्या वापर या संदर्भात अहवाल सादर करावा. जिमचे ऑईलिंग व ग्रिसिंग वेळोवेळी करण्यात यावे.जिमच्या वापर व त्याची देखभाल यांची संपूर्ण जबाबदारी शारिरीक शिक्षक संचालक व प्राचार्यांची असेल.बाहेरिल विद्यार्थ्यांना प्रवेश दयावा किंवा नाही हे शारिरीक शिक्षण संचालक व प्राचार्यानी ठरवावे.इतर विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना त्यांच्या कडून नाममात्र शुल्क घेण्यात यावे.

**७.ग्रंथालय** :— हा महाविद्यालयाच्या आत्मा आहे हे लक्षात घेवून त्यांचे संवर्धन करण्याची संपूर्ण जबाबदारी ग्रंथपाल व प्राचार्यांची असेल. ग्रंथालयाच्या वापर सर्व प्राध्यापंकानी करणे आवश्यक आहे.ग्रंथालयाच्या वापर करतांना प्राध्यापकांनी कपाटातून लागणारी पुस्तके निवडावीत व ते ईश्यु रजिस्टर मध्ये नोंद करूनच पुस्तके न्यावीत. ग्रंथालयातील संगणक,इंटरनेट पुस्तके,संदर्भग्रंथ,जर्नल्स, वर्तमान पत्रे व इतर साहित्य यांच्या संरक्षणाची सर्व जबाबदारी ग्रंथपाल व ग्रंथालय समितीला ग्रामविकास संस्थेने दिली आहे.ग्रंथालय वर्धिष्णू असावे हे लक्षात घेवून ग्रंथपाल,सर्व स्टॉफ यांनी प्राचार्याशी विचार विनिमय करून व ग्रंथालय समितीचा परवानगीने नविन संदर्भ पुस्तके व साहित्य ग्रंथालयात नियमित पणे आणावीत.



COORDINATOR IQAC
Gram Vikas Sanstha's
Arts College Bamkheda T.T.
Tal.Shahada,Dist.Nandurbar

Gram Vikas Sanstha's Art's College Bamkheda T.T. Tal.Shahada — College Est. July 1995

PRINCIPAL
Gram Vikas Sanstha's
Art's College Bamkheda T.T.
Tal.Shahada,Dist.Nandurbar

Scanned by CamScanner

या संदर्भात वेळोवेळी संस्थेच्या पदाधिका–यांशी संपर्क साधावा. ग्रंथालयासंबधी वार्षिक अहवाल वर्षाच्या शेवटी मा.प्राचार्य यांना ग्रंथपाल व ग्रंथालय समिती सादर करेल. तो अहवाल मा.प्राचार्य संस्थेच्या संचालक मंडळाकडे सदर अहवाल सादर करतील.

**८.वाचनकक्ष** :–वाचनकक्ष हा ग्रंथालयाचा अविभाज्य घटक आहे. वाचन कक्ष ग्रंथालयात असेल.स्टाफ साठी व विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळे वाचनकक्ष असतील.वाचनकक्षाच्या वापर करतांना त्या ठिकाणी शांततेचे वातावरण राहील याची ग्रंथपालानी दक्षता घ्यावी.वाचन कक्षाचा वापर या संदर्भात स्वंतत्र रजिस्टर असेल त्यात सदर वापर करतांना संबधींताने येण्याची व जाण्याची वेळ टाकून नोंद करावी. वाचन कक्षा मधील सामुग्री उदा.टेबल,खुर्च्या,फॅन,लाईट व इतर साहित्य यांची जवाबदारी ग्रंथपाल व प्राचार्याकडे देण्यात आली आहे.वाचनकक्षातच पेपर स्टॅन्ड असतील त्यावरील वर्तमानपत्र कोणीही काढू नये त्या स्टॅन्ड समोर उभे राहून वर्तमानपत्र वाचावे.वाचन कक्षाचा अहवाल ग्रंथपाल प्राचार्यांना देतील.वाचन कक्षातील सर्व साहित्याची निगा राखण्यात यावी याची संपूर्ण जबाबदारी संस्था ग्रंथपाल व प्राचार्यांवर टाकत आहे.

**९.आय.टी इंनफ्रास्ट्रक्चर** :– या अंतर्गत संस्थेमार्फत इंटरनेट सेवा,देण्यात आली आहे.तसेच संगणक लॅब तयार करण्यात आली आहे.यात संगणक,प्रिंटर्स,किबोर्डस,माऊस इत्यादींची देखभाल करणे या संदर्भात जबाबदारी मुख्य लिपीक व प्राचार्य यांच्या कडे देण्यात येत आहे. महाविद्यालयात असलेल्या इन्व्हरटर यांची देखभाल करणे हे कामसुध्दा आय.टी इंनफ्रास्ट्रक्चर विभागाकडे सोपविण्यात येत आहे.ग्रंथालय व कार्यालयात असलेल्या या सुविधे अंतर्गत बॅटऱ्या,यातील पाण्याची पातळी वेळोवेळी चेक करून त्या सुव्यवस्थित राहतील याची जबाबदारी मुख्य लिपीक व ग्रंथपालाकडे असेल. आय.टी इंनफ्रास्ट्रक्चर संदर्भातील अहवाल वेळोवेळी प्राचार्याकडे सादर करून प्राचार्यांनी आवश्यकतेनुसार तो व्यवस्थापन मंडळापुढे सादर करावा.

COORDINATOR IQAC
Gram Vikas Sanstha's
Arts College Bamkheda T.T.
Tal.Shahada,Dist.Nandurbar

Gram Vikas Sanstha's Art's College Bamkheda T.T. Tal.Shahada Jun 1995



PRINCIPAL
Gram Vikas Sanstha's
Art's College Bamkheda T.T.
Tal.Shahada,Dist.Nandurbar

Scanned by CamScanner

**१०.भाषा प्रयोगशाळा** :– भाषा प्रयोगशाळा हा महाविद्यालयाचे महत्वाचे अंग आहे.त्याचा वापर करण्याचे अधिकार प्रा.डॉ.योगेश पाटील, इंग्रजी विभाग प्रमूख, कला महाविद्यालय ,बामखेडे.त.त.यांना देण्यात आला आहे. भाषा प्रयोगशाळेत मध्ये ०८ संगणक,स्मार्ट बोर्ड, एलसीडी प्रोजेक्टर व त्यासंबधी साहित्य आहेत. मराठी,हिदी,इंग्रजी या भाषा विषयाच्या प्राध्यापकांनी विद्यार्थ्यामध्ये भाषिक कौशल्य विकसित करण्यासाठी वेळोवेळी वापर करावा. प्रयोगशाळेचा विद्यार्थ्यांना व्यवस्थित वापर करता यावा या दुष्टीने इंटरनेट सुविधा आहे.त्याचप्रमाणे इतर फर्निचर,टेबल,खुर्ची यांची निगा राखण्याची सर्व जबाबदारी डॉ.योगश पाटील यांच्याकडे असेल.भाषा प्रयोगशाळेचा अहवाल प्रा.डॉ.योगेश पाटील यांनी वेळोवेळी प्राचार्यांना दयावा.प्राचार्यानी या सदर्भात व्यवस्थान मंडळाशी वेळोवेळी चर्चा करावी.

**११.प्रोजेक्टर्स**:– कला महाविद्यालय बामखेडे.त.त.च्या इमारतीत वेगवेगळया विभागामध्ये एलसीटी प्रोजेक्टर लावण्यात आलेले आहेत. उदा.मराठी विभाग,हिंदी विभाग,इतिहास विभाग,इंग्रजी विभाग,सेमिनार हॉल. यासर्व विभागातील विभाग प्रमूखांना देखभालीचे व वापर करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.या प्रोजेक्टरच्या अधिका अधिक वापर विद्यार्थ्यांना अध्यापनाचा वेळी करण्यात यावा अशी अपेक्षा आहे.आपापल्या विभागातील प्रोजेक्टरच्या संरक्षणाची जबाबदारी संबधीत विभाग प्रमूखाची असेल या संदर्भातही वेळोवेळी अहवाल प्राचार्यांना दयावा व प्राचार्यांनी तो व्यवस्थापन मंडळाकडे दयावा.प्रोजेक्टर्सची वेळोवेळी सर्व्हीसिंग करण्यात यावी.

**१२.इंटरनेटसेवा** :– कला महाविद्यालय बामखेडे त.त.या महाविद्यालयामध्ये मा. प्राचार्य दालन,ऑफिससर्व विभाग प्रमूख,ग्रंथालय,सेमिनार हॉल,भाषा लॅब, स्वयंमकक्ष इ.विभागामध्ये इंटरनेट सेवा देण्यात आले आहे.याची सर्वजबाबदारी,दुरूस्ती देखभाल व खर्च मा.प्राचार्य यांच्या अधिकारात करण्यात आला आहे .याचा वापर संबधित विभाग प्रमूख व मा.प्राचार्य यांच्या परवानगी शिवाय कोणीही करू नये.विविध राऊटर्स यांच्या माध्यमातून परिसर वायफाय करण्याच्या प्रयत्न करावा.इंटरनेट सेवा खंडीत होणार नाही याची वेळेची दक्षता घेण्यात यावी.यांचा वार्षिक अहवाल संबधित विभाग प्रमूखांनी मा.प्राचार्य यांना देण्यात यावा असे ठरविले आहे.

COORDINATOR IQAC
Gram Vikas Sanstha's
Arts College Bamkheda T.T.
Tal.Shahada,Dist.Nandurbar

PRINCIPAL
Gram Vikas Sanstha's
Art's College Bamkheda T.T.
Tal.Shahada,Dist.Nandurbar



Scanned by CamScanner

UDDHAREDATMNATMANAM

# Gram Vikas Sanstha

Bamkheda T.T. Tal. Shahada, Dist. Nandurbar-425423

ग्रामविकास संस्था संचलित कला महाविद्यालय येथील सर्व इमारती,संपूर्ण स्थावर मालमत्ता व इतर साधन सामुर्गी यांचे सर्व अधिकार संचालक मंडळाने राखून ठेवले आहेत. महाविद्यालयातील संपूर्ण साधन संपत्तीचा वापर प्राचार्यांनी त्यांच्या अधिकारात व इतर कर्मचाऱ्यांच्या सहयोगाने योग्य वेळी व योग्य ठिकाणी करून महाविद्यालयाच्या शैक्षणिक विकास करावा ही संस्थाचालकांची अपेक्षा आहे.साधन सामुग्रीचा वापरासंदर्भात अहवाल संबधित विभाग प्रमूखांनी प्राचार्यांना वेळोवेळी देण्यात यावा व तो अहवाल प्राचार्यांनी व्यवस्थापन मडंळापुढे सादर करावा.

President
Gram Vikas Sanstha Bamkhede T.T
Tal.Shahada,Dist.Nandurbar

COORDINATOR IQAC
Gram Vikas Sanstha's
Arts College Bamkheda T.T.
Tal.Shahada,Dist.Nandurbar

PRINCIPAL
Gram Vikas Sanstha's
Art's College Bamkheda T.T.
Tal.Shahada,Dist.Nandurbar

Gram Vikas Sanstha's Art's College Bamkheda T.T. College EST July 1995 Tal.Shahada



COORDINATOR IQAC
Gram Vikas Sanstha's
Arts College Bamkheda T.T.
Tal.Shahada,Dist.Nandurbar

PRINCIPAL
Gram Vikas Sanstha's
Art's College Bamkheda T.T.
Tal.Shahada,Dist.Nandurbar

Scanned by CamScanner